बुधवार, दि २३ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ७ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# दुकानदारांची देखावा फॅशन ठरतेय वाहतुकीस अडसर

## शहर मनपाचे दुर्लक्ष की अनाधिकृत परवानगी? जिल्हाधिकारी लक्ष देतील का?

**दीपक शेळके**

**जालना** - शहरातील मामा चौक परिसरासह विविध मार्गावरील दुकानदारांनी आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभुमीवर बाहेरच्या बाजुने रस्त्याच्या कडेला तर कुठे थेट रस्त्यावर केलेल्या देखाव्याची फॅशनमुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असून याकडे शहर मनपा प्रशासनाचे सर्रास दुर्लक्ष होत आहे. शहर मनपाने या दुकानदारांना अनाधिकृतरित्या परवानगी तर दिली नाही ना? असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होतो आहे. या गंभीर विषयाकडे मनपा प्रशासनाने लक्ष देण्यास वेळ नसल्याने या अनाधिकृत फॅशनबाजांवर जिल्हाधिकारी यांनीच कारवाई करावी अशी मागणी वाहनधारकांमधून होत आहे.

शहरातील मामा चौक परिसर, सिंधी बाजार परिसरासह विविध मार्गावर दुकानदार त्यांच्याकडील वस्तुंची विक्री वाढावी या हेतूने ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नव-नवीन शक्कल लढवीत आहेत. यातच दुकानाच्या बाहेर मंडप टाकून बॅनरबाजीसह देखाव्याने ग्राहकांच्या नजरा दुकानांवर याव्यात यासाठी अनाधिकृतरित्या शहर विद्रुपिकरणात भर पडेल असे फॅशनेबल देखावे लावण्यात येत आहे. या फॅशनेबल देखाव्यांमुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. दुकानाबाहेर लावण्यात येणारी वाहने ही रस्त्यावर लागत आहे. परिणामी वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. याकडे शहर महानगर पालिकेचे सर्रास दुर्लक्ष होत आहे. या भागात मनपाचे कार्यरत असलेले स्वच्छता निरीक्षकांच्या हि बाब लक्षात आली नसावी का? स्वच्छता निरीक्षक काही स्वहितासाठी याकडे कानाडोळा करत आहेत का? यासह मनपानेच अनाधिकृतरित्या या फॅशनबाजांना परवानगी दिली आहे का? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या गंभीर विषयाकडे शहर मनपाला लक्ष देण्यासाठी वेळ नाही. दिवसेंदिवस अशा फॅशनेबल देखाव्यांची, बॅनरबाजांचा संख्या वाढत चालली आहे. ही गंभीर बाब आहे. आता जिल्हाधिकारी यांनी फॅशनबाज-बॅनरबाज दुकानदारांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.







### युवा आदर्श

**दया मरण ...**

अति क्लिष्ट निर्णय
संमतीने दया मरण
सोपे नसते कधीही
मृत्युला जाणे शरण
विचीत्र घातक योग
स्वताचे रचणे सरण
असाध्य दुर्धरता रोग
मृत्यु स्वागता तोरण
असह्य होतात वेदना
जगण्याचे चीर हरण
चिर विश्रांती घ्यायची
स्मशानी चाले चरण
कायद्याचा गुंतावळा
अडथळे ते अ कारण
मरणप्राय वेदना होई
संमतीपत्र हस्तांतरण
ठरवणारं नाते वाईक
लाईफसपोर्टचे धोरण
अस्वस्थमानसस्थिती
भावनांचे फुटतेधरण
वेळ येऊ नये शत्रुसही
मागायची इच्छा मरण
तुझ्याहाती ठेव अत्र
शिव शंकरा नारायण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

विधानसभा निवडणुक २०२४ अर्ज भरण्यास सुरुवात; महाविकास आघाडीचे घोडे अडलेलं!

# शिवसेनेकडुन खोतकरांना उमेदवारी; काँग्रेसकडुन गोरंट्याल कि हाफिज चुरस कायम

**जालना । प्रतिनिधी-** विधानसभा निवडणुक २०२४ साठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास मंगळवार (दि २२) सुरुवात झाली आहे. जालना विधानसभा मतदार संघात एका अपक्ष उमेदवाराने पहिल्याच दिवशी आपला नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. रात्री उशिरा महायुतीतील शिवसेनेने (शिंदे गट) ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहिर केली. या यादीत जालना विधानसभेसाठी अर्जुनराव खोतकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दुसरीकडे काँग्रेसकडुन कैलास गोरंट्याल की अब्दुल हाफिज यांच्यात उमेदवारीसाठी चुरस आहे. विद्यमान आमदार असल्याने गोरंट्याल यांचेच पारडे जड मानल्या जात आहे. त्यामुळे जालना विधानसभा निवडणुक ही परंपरेने चालत आलेल्या परंपरांगत खोतकर - गोरंट्याल अशीच होण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे. दोन दिवसांपुर्वीच भाजपाने ९९ उमेदवार जाहीर केले. वंचित बहुजन आघाडीसह तिसऱ्या आघाडी व मनसेनेही काही जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. मंगळवार रात्री उशिरा शिवसेनेने (शिंदे गट) उमेदवार जाहीर केले आहेत.



जालना विधानसभेत विद्यमान आमदार हे काँग्रेस पक्षाचे आहेत. काँग्रेस महाविकास आघाडीतील घटक पक्ष आहे. राज्य स्तरावरील नेत्यांकडुन अद्यापही यादी आली नसल्याने जालन्यातील काँग्रेस नेते व पदाधिकाऱ्यांत संभ्रम निर्माण होत आहे. येथे विद्यमान आमदारांना पक्षाकडुन तिकीट मिळणार की मुस्लीम समुदायाची मागणी होत असलेले अब्दुल हाफीज यांना उमेदवारी मिळणार याकडे काँग्रेसजनांसह मुस्लीम समुदायाचे लक्ष लागून आहे. या दोन्ही उमेदवारांसाठी आपआपल्या कार्यकर्त्यांकडून उमेदवारीसाठी जोरदार मागणी होत आहे. मध्यंतरी काँग्रेसचे निवडणुक निरीक्षक यांच्यासमोरच कैलास गोरंट्याल आणि अब्दुल हाफिज यांचे समर्थक समोरासमोर आले. याच दिवशी गोरंट्याल यांनी अब्दुल हाफिज यांचा खालच्या पातळीवर जावून समाचार घेतला होता. त्यामुळे मुस्लीम समुदायासह जालनेकरांमध्ये नाराजी होती. कार्यकर्त्यांना आमदार समजतात काय? सुरुवातीला आमदार कैलास गोरंट्याल स्वतः नंतर त्यांच्या सौभाग्यवती संगीताताई गोरंट्याल आता भविष्यात मुलगा अक्षय गोरंट्याल का? कार्यकर्त्यांनी काय केवळ यांच्या सतरंज्याच उचलायच्या का? अशा प्रतिक्रीया ही त्यावेळी उमटल्या. हा केवळ एकट्या अब्दुल हाफिज यांच्या पुरता विषय मर्यादीत नसुन गोरंट्याल समर्थक असलेले विविध पदाधिकारी, माजी नगरसेवक हे भविष्यातील महापौर तसेच आमदारकीचे उमेदवार होवू शकतात त्यावेळेस देखील कैलास गोरंट्याल हीच भुमिका ठेवणार का? या पदाधिकाऱ्यांनाही गोरंट्याल असेच संबोधीत करणार का? म्हणे मीच मोठं केल. हे कितपत योग्य होते आणि आहे असा प्रश्न काँग्रेसजनांत उपस्थित झाल्यास नवल नको आणि यामुळे कदाचित पुढे गोरंट्याल यांना स्वपक्षातूनच विरोध होण्यास वेळ लागणार नाही.

कैलास गोरंट्याल यांना उमेदवारी मिळाली तरी अब्दुल हाफिज यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्याचा निर्णय त्यांच्या समर्थकांनी घेतलेला असल्याचे कळते आहे. त्यामुळे अर्ज भरण्यास सुरुवात झाल्यानंतरही काँग्रेसचे अद्याप ठरलेले नाही. त्यातच महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही या ठिकाणी दावा केला आहे. येथील राजेंद्र जाधव यांच्या समर्थकांसह स्वतः राजेंद्र जाधव यांनी जालना विधानसभेसाठी उमेदवारी मागितली असून जिंकून येण्याचा दावाही त्यांनी केला आहे.

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडेही राज्याचे लक्ष्य लागून आहे. नुकतेच त्यांनी निवडून येण्याची क्षमता असलेल्या मतदार संघात उमेदवार उभा करणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे जालना विधानसभा मतदार संघातून जरांगे यांनी उमेदवार दिल्यास महायुती आणि महाविकास आघाडी दोघांसाठीही धोक्याची घंटा ठरणार आहे.

## शिंदेंच्या शिवसेनेचे ४५ शिलेदार ठरले; जालन्यातून खोतकर रिंगणात

**मुंबई -** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. शिंदेंच्या नेतृत्वात लढली जाणारी ही पहिली निवडणूक असून आता शिवसेनेने आता ४५ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने प्रसिद्धी पत्रकारद्वारे ही पहिली यादी जाहीर केली आहे. गेल्या काही दिवसांपासून महायुतीमध्ये जागा वाटपाच्या चर्चा सुरु होत्या. त्यानंतर भारतीय जनता पक्षाने पहिल्यांदा ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली होती. त्यानंतर अजित पवारांनी पुढचं पाऊल टाकतं १७ जणांना एबी फॉर्मचे वाटप केले होते. दरम्यान, एकनाथ शिंदेंनी आता ४५ उमेदवार जाहीर केले आहेत. शिदेंच्या पहिल्या यादीत अनेक विद्यमान आमदारांचा समावेश आहे. जालना विधानसभा मतदार संघातून माजी राज्यमंत्री तथा शिवसेनेचे नेते अर्जुनराव खोतकर यांना रिंगणात उतरवले आहे. **शिंदेंच्या शिवसेनेची उमेदवार यादी** १. एकनाथ शिंदे - कोपची पाचपाखाडी, २. साक्री - मंजुळा गावीत, ३. चोपडा - चंद्रकांत सोनवणे, ४. जळगाव ग्रामीण - गुलाबराव पाटील, ५. पाचोरा - किशोर पाटील, ६. एरंडोल - अमोल पाटील, ७. मुक्ताईनगर - चंद्रकांत पाटील, ८. बुलढाणा - संजय गायकवाड, ९. मेहकर - संजय रायमुलकर, १०.दर्यापूर - अभिजीत अडसूळ ११. आशिष जयस्वाल - रामटेक, १२. भंडारा - नरेंद्र भोंडेकर, १३. दिग्रस - संजय राठोड, १४. नांदेड उत्तर - बालाजी कल्याणकर, १५.कळमनुरी - संतोष बांगर, १६. जालना - अर्जुन खोतकर, १७.सिल्लोड - अब्दुल सत्तार, १८.छ संभाजीनगर मध्य - प्रदीप जयस्वाल, १९. छ. संभाजीनगर पश्चिम - संजय सिरसाट, २०. पैठण - रमेश भूमरे, २१.वैजापूर - रमेश बोरनारे, २२.नांदगाव - सुहास कांदे, २३. मालेगाव बाह्य - दादाजी भूसे, २४. ओवळा माजीवडा - प्रताप सरनाईक, २५. मागाठाणे - प्रकाश सुर्वे, २६. जोगेश्वरी पूर्व - मनीषा वायकर, २७. चांदिवली - दिलीप लांडे, २८. कुर्ला - मंगेश कुडाळकर, २९. माहीम - सदा सरवणकर, ३०. भायखळा - यामिनी जाधव, ३१. कर्जत महेंद्र थोरवे, ३२. अलिबाग - महेंद्र दळवी, ३३. महाड - भरत गोगावले, ३४. उमरगा - ज्ञानराज चौगुले, ३५. सांगोला - शहाजीबापू पाटील, ३६. कोरेगाव - महेश शिंदे, ३७. परांडा - तानाजी सावंत, ३८. पाटण - शंभूराज देसाई, ३९. दापोली - योगेश कदम, ४०. रत्नागिरी - उदय सामंत, ४१. राजापूर - किरण सामंत, ४२. सावंतवाडी - दीपक केसरकर, ४३. राधानगरी - प्रकाश आबिटकर, ४४. करवीर - चंद्रदीप नरके, ४५. खानापूर - सुहास बाबर,

# महान स्वातंत्र्यसेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची जयंती आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निःष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी योग्य नियोजन करावे

## विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या सूचना; निवडणूक पूर्वतयारी आढावा बैठक

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीताचे जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. याअनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रत्येक नियमांचे व सूचनांचे जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काटेकोर पालन करुन ही निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निःष्पक्ष वातावरणात पार पडण्यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिल्या.



येथील जिल्हाधिकारी कार्यालयात विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत विभागीय आयुक्त श्री. गावडे बोलत होते. यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मिना, पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, विभागीय उपायुक्त जगदीश मिणियार, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशीकांत हदगल, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, सर्व जिल्हा निवडणूक निर्णय अधकारी, सर्व नोडल अधिकारी यांची यावेळी उपस्थिती होती.

श्री. गावडे की, लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक मतदाराचे मतदान महत्त्वपूर्ण व निर्णायक आहे. प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजाविल्याशिवाय लोकशाहीला पूर्णत्व नाही. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने राज्यघटनेने दिलेल्या मतदान करण्याच्या अधिकाराचा वापर करावा. पुढे बोलतांना ते म्हणाले की, मतदार जनजागृती व साक्षरतेसाठी स्वीप मोहिमे अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात यावे. युवा मतदारांना मतदानाच्या राष्ट्रीय उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे. जिल्ह्यातील ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांचे गृहमतदान अधिक प्रमाणात होण्यासाठी प्रयत्न करावे. आदर्श आचारसंहितेचे उमेदवारांकडून काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री करावी. तसेच मतदान केंद्रे, मतदारांची माहिती, मतदानाची ठिकाणे व तेथील व्यवस्था, प्रशिक्षण कार्यक्रम, मनुष्यबळ, आचारसंहिता कक्ष, सीव्हीजील प, खर्च सनियंत्रण समिति पथक, आदर्श आचारसंहितेचे पालन, कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात चेकपोस्टद्वारे तपासणी, उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तपासणी, राजकीय प्रचाराच्या जाहिराती व चित्रफीतींचे माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणिकरण, पेड न्यूज आदी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने विविध विषयांचा विभागीय आयुक्तांनी यावेळी सविस्तर आढावा घेतला. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी यावेळी सादरीकरणांद्वारे विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती सादर केली.

## राज्यस्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत क्रीडा प्रबोधिनी संघाची सुवर्ण कमाई



**जालना । प्रतिनिधी -** क्रीडा व युवक सेवा संचालक महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत तालुका क्रीडा संकुल कोपरी जिल्हा ठाणे येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय १७ वर्षाखालील शालेय मुलींच्या कबड्डी स्पर्धेत जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनी च्या मुलीच्या संघाने संपूर्ण स्पर्धेवर वर्चस्व गाजवत पहिल्या फेरीत कोल्हापूर संघाला १ गुणाने हरविले तर उपांत्य फेरीत मुंबई संघाला एकतर्फी २५ गुणांनी हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला व अंतिम फेरीत संपुर्ण सामन्यात वर्चस्व गाजवत नाशिक संघाला १५ गुणांनी हरवीले व सुवर्ण पदकाची ची कमाई केली. विजय संघात अक्षरां अंभुरे, राणी भुजंग, मोनिका पवार, कल्याणी शिंदे, नंदा नागवे, भाग्यश्री गायकवाड, साक्षी शिंदे, दीक्षा शिंदे,आरती डिघे, मुयुरी टकले, वैष्णवी शेवत्रे व पूजा गाडे यांचा समावेश होतो. या संघाला प्रशिक्षक रविंद्र ढगे, गणेश ढगे, संतोष मोरे, अमोल चव्हाण, प्रियंका येळे व जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीचे व्यवस्थापक श्री.प्रमोदजी खरात यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विजय खेळाडूंचे जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना मडम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजु सोळुंके साहेब, शिक्षणाधिकारी कैलाश दातखीळ, उपशिक्षणाधिकारी शाम देशमुख, प्रशासकीय अधिकारी श्रीमती विनया वडजे, प्रशासकीय अधिकारी प्रभाकर शिंदे, लेखाधिकारी व भाऊसाहेब नेटके यांनी अभिनंदन केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# परतूर विधानसभा मतदारसंघात विविध आवास योजनेत १४७८४ घरकुलासाठी १९९ कोटी रुपयांच्या निधी

## आमदार बबनराव लोणीकर यांचे विशेष प्रयत्न

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी मंजूर तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु मंजूर, मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर आपण केंद्र सरकार च्या आरोग्य मंत्रालयाकडून मंजूर करून आणला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. सातोना व श्रीष्टी जिल्हा परिषद सर्कल मधील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठका आज सातोना व दैठणा या ठिकाणी संपन्न झाल्या याप्रसंगी उपस्थित भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. या वेळी पुढे बोलतांना परतूर विधानसभा मतदारसंघात शेगाव पंढरपूर दिंडी महामार्ग या सह प्रमुख राज्य मार्ग महामार्ग जिल्हा मार्ग गावा गावाला जोडणारे रस्ते, प्रत्येक रस्त्यावर पूल, गावागावातील तांडे वाड्या वस्त्यावरील पाणंद रस्ते परतुर शहरातील उड्डाणपूल, स्वर्गीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वातानुकूलित नाट्यगृह, वंदनीय विश्वरत्न परम पूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह तालुका व जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारती, क्रीडा संकुल, गावा गावात २४ तास वीज उपलब्ध होण्यासाठी नवीन पोल व डिप्या करीता आणी मतदार संघाच्या सर्वांगीन विकासासाठी आपण केंद्र व राज्य सरकार च्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात सात हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करून आणला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. मुख्यमंत्री लडकी बहीण योजना, दिव्यांग बांधवांच्या योजना, मुख्यमंत्री लाडकी लेक योजना, सावित्रीबाई फुले स्वातंत्र्य स्वयं योजना, अनाथ बालकांच्या योजना आशा केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून राज्यभरात राबविलेल्या शेकडो योजनांचा लाभ तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याकरिता आपण परतूर मंठा जालना या तहसील कार्यालया सह जिल्हा अधिकारी जालना यांच्या दालनात आढावा बैठक घेऊन परतुर मंठा वनेर सेवली सर्कल मध्ये भव्य जनजागृती मेळावा व कॅम्पचे आयोजन केले होते यातून मतदारसंघातील लाखो लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला असून. मोदी आवास योजना शबरी आवास योजना रमाई आवास योजना यशवंतराव चव्हाण आवास योजना पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आवास योजना या विविध योजनेच्या माध्यमातून परतुर विधानसभा मतदारसंघातील पंचवीस हजार लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला असल्याची माहिती यावेळी आमदार बबनराव लोणीकर आपल्या भाषणात म्हणाले.



या प्रसंगी सातोना येथे भाजपा महाराष्ट्र राज्य प्रदेश सचिव राहुलभय्या लोणीकर, परतूर विधानसभा प्रभारी निरीक्षक माजी आमदार संजय दिंडे, विलासभाऊ आकात, परमेश्वरनाना आकात, निवृत्तीआप्पा लाटे, संपतराव टकले, नगरसेवक शिवराज जाधव, रोहनभैया आकात, बंडु मानवतकर, रेंगे पाटील, सरपंच विकास खरात, बबनदादा आकात, पैलवान विलास आकात, बाबासाहेब आकात, अक्षयभैया आकात, आबा आकात, अशोकराव खंदारे, शिवाजीदादा घनवट, परमेश्वर लाटे, सुधाकर बेरगुडे, भगवानराव आकात, विठ्ठलराव बिडवे, नारायण बिडवे, गोपाळराव बिडवे, नामदेवतात्या आकात, सय्यद अली, अशोक दांगट. सर्जेराव मानवतकर. ओमजी साठे, प्रकाश चव्हाण, नामदेव मानवतकर. रामप्रसाद गाढवे, नदीम सरपंच. गोपाल गोरे. राहुल काळे, विलास मोठे, युसुफ भाई यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी टोकवाडी तालुका मंठा येथील पश्चिम तांडा व टोकवाडी येथील दलित आघाडी पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर साहेब व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या विकास कामावर विश्वास ठेवून व आनंद जाधव जनार्धन वायाळ सोनाजी जाधव कृष्णा जाधव भगवान लहाने यांच्या पुढाकाराने अनेक युवकांनी व जेष्ठ नागरिकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला प्रवेशामध्ये टोकवाडी गावचे उपसरपंच मल्हारी प्रधान विकास राठोड विनोद आढे नारायण आढे अंबादास राठोड बाळू राठोड राजेश राठोड संतोष राठोड सुरेश राठोड जानकीराम राठोड गुलाब आढे, भाऊराव राठोड संजय राठोड भारत राठोड संपत चव्हाण ज्ञानेश्वर राठोड राहुल कांबळे अशोक चव्हाण बाबासाहेब प्रधान महादेव प्रधान विशाल प्रधान भीमराव चव्हाण तुळशीराम प्रधान विकास कांबळे राजेश जाधव अशा असंख्य कार्यकर्त्यांनी यावेळी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

तर श्रीष्टी सर्कल मधील दैठना येथील कार्यक्रमास भाजपा महाराष्ट्र राज्य प्रदेश सचिव राहुलभय्या लोणीकर, परतूर विधानसभा प्रभारी निरीक्षक माजी आमदार संजय दिंडे, शिवराज जाधव शत्रुघन कणसे संपत टकले बद्री भाऊ ढवळे रमेश भापकर रवी सोळंके संभाजी वारे अंकुशराव नवल किरण अंभोरे संभाजी खवल रमेशराव आढाव अंगत शेरे अरुण जगदाळे नारायणराव सोळुंके सदाशिव खवल संभाजी शिंदे शामराव चव्हाण लक्ष्मण दादा शिंदे महादेवराव बरकुले मुंजाजी झरेकर सदाशिवराव गोरे दत्ताभाऊ धुमाळ गोरख गाडगे भरत अंभोरे राजेंद्र खानापुरे गंगाधर बापू सुरंग अनिल भापकर सतीश गाडगे नितीन जोगदंड सखाराम भापकर विठ्ठल सस्ते विष्णू खालापुरे नामदेव शिखरे राजाभाऊ खालापुरे पुंजाराम खालापूरे कुंडलिकराव वटाणे गणेशराव खवल भीमराव साळवे कैलास साळवे सौरव मुंडे भगवान रोडगे परमेश्वर शेरे गणपत शिंदे सर्जेराव जाधव किसनराव आघाव विष्णू बरकुले पांडुरंग खरात दत्ता राव धुमाळ दत्ताभाऊ रायकर भरत रायकर यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

---

जाफराबाद तालुक्यात निराधार योजना लाभार्थ्यांना कोरे मंजुरी आदेशाचे वाटप!

# आचार संहिता सुरू असतांनाही भाजपकडून जनतेच्या डोळयात धूळफेक

## राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रामधन कळंबे यांचा आरोप

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मंजुरीचे कोरे आदेश वाटण्याचे काम सुरू असून जेवढे अर्ज आले तेवढे मंजूर दाखवले जात आहेत. निवडणुकीच्या तोंडावर आमिष दाखवण्याचे काम सुरू आहे , मंजुरी आदेशावर डिजिटल स्वाक्षरी करण्यात आली आहे.निराधार योजनेची यादी फायनल झाली असल्यास जाफराबाद तहसील कार्यालयात लावण्यात आलेली नसून आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने तुमचे प्रस्ताव मंजूर करण्यात येईल असे आमिष दाखवले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे जाफराबाद तालुकाध्यक्ष रामधन कळंबे यांनी केला आहे.याविषयी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की सध्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना देखील संजय गांधी निराधार योजनेचे प्रस्ताव मंजूर असल्याचा



बनाव करून मंजुरी आदेश वाटप करण्यात येत आहेत अधिक माहितीसाठी भाजपा कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन या मंजुरी पत्रावर करण्यात आलेले आहे. संजय गांधी निराधार योजनेचे अधिकृत कार्यालय तहसील कार्यालयात असताना भाजप कार्यालयात बोलावले जात आहे.भाजप च्या प्रत्येक कार्यकर्त्याजवळ संजय गांधी निराधार योजनेची एक्सल शिट यादी आहे या यादीमध्ये प्रस्ताव मंजूर किंवा नामंजूर असा कोणताही शेरा नाही,फक्त ज्यांनी अर्ज दाखल केले आहेत त्यांचे नाव टाकून मंजुरी आदेश असल्याचा बनाव करत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. निराधार योजनेची यादी मंजूर नसल्याचे संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार सांगत आहेत. मागील वेळी देखील जाफराबाद तहसील कार्यालयातून शेकडो निराधारांचे प्रस्तावांना पाय फुटले होते,विशिष्ट, जातीचे समाजाचे प्रस्ताव गायब करण्यात आले होते.आम्ही याप्रकरणी आवाज उठवल्यानंतर सदर प्रस्ताव पुन्हा तहसील कार्यालयात परत आले होते असा आरोप देखील त्यांनी केला आहे. संजय गांधी निराधार योजनेकच्या प्रस्ताव मंजूर अगर ना मंजुरीचा आदेश हा शासकीय असतो मात्र आगामी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मतांची बेगमी करण्यासाठी सर्व खटाटोप सुरू असल्याचा आरोप ही त्यांनी केला आहे.जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी लक्ष देऊन जनतेच्या डोळ्यात होत असलेली धूळफेक थांबवावी अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

---

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# विधानसभा मतदार संघासाठी २ उमेदवारांचे ३ अर्ज दाखल

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज २ उमेदवारांनी ३ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. आजपर्यंत एकुण २ उमेदवारांचे ३ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

## पहिल्या दिवशी १५८ उमेदवारांना ४०३ नामनिर्देशन अर्जाचे वितरण

९९-परतूर, १०२- बदनापूर आणि १०३-भोकरदन या तीन विधानसभा मतदार संघासाठी आज कोणीही अर्ज दाखल केला नाही. मंगळवार दि. २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी १००-घनसावंगी मतदारसंघासाठी चोथे शिवाजीराव कुंडलिकराव (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) यांनी दोन तर १०१-जालना विधानसभा मतदारसंघासाठी मिलिंद बालु बोर्डे (अपक्ष) यांनी एक नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. याप्रमाणे चोथे शिवाजीराव कुंडलिकराव (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) आणि मिलिंद बालू बोर्डे (अपक्ष) याप्रमाणे आज दोन नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली. आजच एकूण १५८ इच्छुक उमेदवारांना ४०३ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल शनिवार दि. २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.

## घाटगे पाटलांचा नाद खुळा; ‘समृद्धी’ ‘क्षमता’ ‘विस्तारीकरण’..!

# हे ट्रेलर आहे; वादळ अजून बाकी आहे - सतीश घाटगे

**समृद्धी कारखान्याच्या १० हजार मे. टन गाळप क्षमतेच्या विस्तारीकरण प्रकल्पाचा भूमिपुजन सोहळ्याच्या माध्यमातून सतीश घाटगे यांनी आपली ‘क्षमता’ त्याचे झालेले ‘विस्तारिकरण’ आणि भविष्यात घनसावंगी मतदार संघाची होणारी ‘समृद्धी’ यांचे अनोखे दर्शन घडविले आहे, कार्यक्रमा झालेली गर्दी पाहता घाटगे पाटलांचा नादच खुळा असं सहजच अनेकांच्या ओठी शब्द निघत होते.**



**घनसावंगी । प्रतिनिधी -** समृद्धी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण झाल्यास शेतकऱ्यांचा उस बांधावर पडू नये, त्यांच्या उसाला न्याय आणि चांगला भाव मिळावा, म्हणून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी शेतकऱ्यांसाठी समृद्धी कारखान्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी (दि. २२) समृद्धीच्या १० हजार मे. टन गाळप क्षमतेच्या विस्तारीकरण प्रकल्पाचा हजारो ऊस उत्पादक शेतकरी व कामगार यांच्या हस्ते मोठ्या भूमिजन सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी सतीश घाटगे यांनी विधानसभा निवडणूक लढण्याचा निर्धार पुन्हा एकदा जनतेसमोर जाहीर केला आहे. ज्या पद्धतीने साखर कारखानदारीत ‘समृद्धी’ने परिवर्तन केले, उस उत्पादक शेतकऱ्यांना भयमुक्त केले. त्याच पद्धतीने जनतेच्या साथीने आगामी विधानसभा निवडणूक घनसावंगीत राजकीय परिवर्तन करणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अंबड - घनसावंगी तालुक्यात उसाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. येणाऱ्या काळात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच शेतकऱ्यांना भयमुक्त होऊन उसाची लागवड करता यावी म्हणून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी शेतकऱ्यांसाठी समृद्धी कारखान्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. ऊस उत्पादक शेतकरी, उसतोड कामगार व उसतोड यंत्रणेतील कामगारांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. विस्तारीकरणानंतर समृद्धीची प्रती दिन गाळप क्षमता १० हजार मे. टन आहे. हा प्रकल्प नोव्हेंबर-२०२५ पर्यंत उभा करण्याचा प्रयत्न समृद्धी कारखाना करणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यास विजय कामड, गौतम गोलेच्छा, शिवाजीराव बोबडे, बालाजी खोजे, भगवान बर्वे, बाळासाहेब बोरकर, पांडुरंग भांगे, अरुण घुगे, शिवाजीराव कटारे , शिवाजीराव कंटूले, शिवाजी नाना मोरे, राहुल कणके, नामदेव ढाकणे, पांडुरंग खटके, रामेश्वर माने, सर्व संचालक मंडळ, कारखान्याचे सर्व विभागाचे अधिकारी, भाजपचे सर्व नेते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सतीश घाटगे यांच्या ‘व्हिजन’ने शेतकरी प्रभावित

या भूमिपूजन सोहळ्यात सतीश घाटगे यांनी येणाऱ्या काळात शेतकरी, युवक, महिला अशा सर्व घटकासाठी असलेले विकासाचे व्हिजन मांडले. हे व्हिजन पाहून आणि ऐकून सर्व शेतकरी प्रभावित झाले. दुष्काळी गावांसाठी पाणीदार करणाऱ्या त्यांच्या व्हिजनची जालना आणि घनसावंगी तालुक्यात चर्चा सुरु झाली आहे.

### २५ वर्षात जे झाल नाही, ते ५ वर्षात करून दाखवणार

प्रस्थापित आमदारांनी २५ वर्षात जनतेला मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवलं शासनाच्या जनकल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले नाही म्हणून घनसावंगी येथील प्रत्येक घटकातील जनतेच्या विकासासाठी जे २५ वर्षात झालं नाही ते पाच वर्षांमध्ये करून दाखवीन असा शब्द सतीश घाडगे यांनी उपस्थित शेतकरी वर्गांना दिला. हा शब्द देताना त्यांनी सांगितलं की मी जे बोलतो ते करतो बारामती करायची जबाबदारी आता मी पूर्ण करून दाखवतो असे शब्द त्यांनी आमदार राजेश टोपे यांच्यावर टीका देखील केली.

### शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी गोदावरी-दुधनेचा संगम

शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी गोदावरी आणि दुधना नदीचा संगम करणार घनसावंगी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या जालना त आणि घनसावंगी तालुक्यातील दुष्काळी गावांना कायम चे दुष्काळमुक्त करायचे असल्यास गोदावरीचे पाणी आपल्या भागातील नद्यांना आणावेच लागेल हे पाणी कसे येणार याची चित्रफित या सोहळ्यात शेतकरी वर्गाला दाखवण्यात आली ही चित्रफित प्रस्तावित गुंज उपसा जलसिंचन योजना यावर आधारित होती या चित्रफितीमुळे उपस्थित शेतकरी प्रभावित झाले.

# मनपाने दहा हजार रुपये भरपाई द्यावी

## वकिलांच्या शिष्टमंडळाचे उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नुतन वसाहत भागातील पाण्याच्या टाकीत मृतदेह आढळल्यानंतर त्या टाकीतील पाणी अनेक भागातील नागरिकांना पिण्यासाठी म्हणून नळाद्वारे पुरवठा करण्यात आले होते. या प्रकारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यासाठी शहर महानगर पालिकेच्यावतीने या भागातील नागरिकांना उपचारासाठी दहा ते पंधरा हजार रुपये देण्यात यावे, अशी मागणी वकीलांच्या शिष्टमंडळाने उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

वकिलांच्या शिष्टमंडळात ॲड. महेश धन्नावत, ॲड. महेंद्र साळवे, ॲड. शुभम भारुका आदींचा समावेश होता.

निवेदनात म्हटले आहे की, शहर महानगर पालिकेचे आयुक्त यांच्या दुर्लक्षतेमुळे नुतनवसाहत, जमुनानगर, विद्युत नगर, आनंद नगर, लहुजी नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, जय नगर, ऋषीपार्क, विसावा शाळा, म्हाडा कॉलनी, रेवगांव रोड, योहान चौक, गंगाधर वाडी, सतकर कॉम्प्लेक्स या परिसरातील लोकांना दुषित पाणी प्यावे लागले व त्यांचे आरोग्य धोक्यात आले. लोकांनी तक्रार केल्यानंतर सुध्दा महानगरपालीका यांनी दुर्लक्ष केले व शेवटी जलकुंभात शव आढळुन आले व लाकडं, बाटल्या अन् चपला सुध्दा आढळुन आल्या. सदर घटना हि दिनांक १४-१०-२०२४ रोजी घडली, नंतर महानगरपालिका यांच्या मार्फत सुध्दा सुचना देण्यात आली होती की, नागरीकांनी आरोग्य तपासणी करुन घ्यावी. त्यामुळे आता अनेक नागरीकांच्या आरोग्यावर दुषित पाण्यामुळे परिणाम झालेले आहे व त्यांना उपचारासाठी खर्च सुध्दा येत आहे. त्यामुळे महानगर पालिकेमार्फत प्रत्येकांना रुपये दहा ते पंधरा हजार द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे शहर महानगर पालिका आयुक्त यांनी जवाबदारी घेत पदाचा त्याग करावा असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.




# मराठा आरक्षणासाठी सोयंजना येथील युवकाची आत्महत्या



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील सोयंजना येथील ३८ वर्षीय युवकाने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून आत्म हत्या केल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली आहे.विलास तुळशीदास सोळंके असे आत्म हत्या केलेल्या युवकाचे नाव आहे.मी मराठा आरक्षण मुळे आत्महत्या करत आहे. तरी सरकारला विनंती, आरक्षण देणे. असा उल्लेख असलेली सूसाईड चिठ्ठी त्याच्या खिशात सापडल्याची माहिति नातेवाईकानी दिली आहे. मराठा आरक्षणावर निवडणुकीआधी कोणताच निर्णय झाला नाही, आता माझ्या मुलांच्या शिक्षणाचे कसे होणार अशी चिंता. कापड दुकानावर मजूर म्हणून काम ाला असलेला विकास आपल्या पत्नीकडे व्यक्त करत होता.

मागील चारपाच दिवसांपासून त्याची मनस्थिति अस्वस्थ असल्याची जाणवत होते. रविवारी रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास घरातील कोणाला काहीही न सांगता तो घरातून निघून गेला होता. सोमवारी सकाळ पासून त्याचा शोधाशोध सुरू असताना, शेतातील झाडाला गळफास घेतलेल्या स्थितीत त्याचा मृतदेह आढळून आला.

त्याच्या पश्चात पत्नी, तीन मुले, आई, वडील, भाऊ असा मोठा परिवार आहे. या घटनेने सोयंजना परतूर आणि परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

